# प्रेसनोट

वनक्षेत्रपाल कार्यालय, कणकवली, जि.सिंधुदुर्ग येथील वनरक्षक श्री. शिर्के यांनी लाचेची मागणी केल्याने त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | सिंधुदुर्ग |
| गुन्हा नोंद क्रमांक | /२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७, ७ अ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. नारायण भास्कर शिर्के, वनरक्षक, वनक्षेत्रपाल कार्यालय, कणकवली, मु.जानवली, ता. कणकवली जि.सिंधुदुर्ग |
| मागणी केलेली लाच रक्कम | ३५,०००/– रूपये |

**थोडक्यात हकीगत:-**

यातील तक्रारदार हे लाकुड व्यवसायिक असुन त्यांनी मु.पो. नागवे, ता. कणकवली येथील जंगलातील लाकुड तोडुन त्याची वाहतुक करणेची परवानगी मिळणेकरीता, वनक्षेत्रपाल कार्यालय, कणकवली येथे सुमारे ३ महीन्यापुर्वी अर्ज दिलेला होता. त्या अनुषंगाने त्यांनी लाकुड तोड व लाकुड वाहतुक मार्च २०२३ अखेरीस पुर्ण केली. सदर लाकुड वाहतुकीच्या मुदतवाढी सबंधी विचारपुस करणेकरीता तक्रारदार हे वनक्षेत्रपाल कार्यालय कणकवली येथे गेले असता तेथील लोकसेवक श्री. शिर्के यांनी तक्रारदार यांना लाकुडतोड व वाहतुकच्या झालेल्या कामाचे ४०,०००/- रू. लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. शिर्के यांची ॲन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांचेकडे दिनांक ११/०४/२०२३ रोजी लेखी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ११/०४/२०२३ रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता लोकसेवक श्री. शिर्के, वनरक्षक, वनक्षेत्रपाल कार्यालय कणकवली यांनी नागवे, ता. कणकवली येथील जंगलातील लाकुडतोड व लाकुड वाहतुकीच्या झालेल्या कामाचे ३५,०००/- रू. लाचेची मागणी केलेली असल्याने लोकसेवक श्री. नारायण भास्कर शिर्के, वनमजुर, वनक्षेत्रपाल कार्यालय कणकवली, वर्ग-४ यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ संशोधन २०१८ चे कलम ७, ७ अ अन्वये लाचेच्या मागणीचा गुन्हा दाखल करीत आहोत.

वरील कारवाई श्री. शिवाजी पाटील, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदूर्ग यांचेकडून करण्यात आलेली आहे.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग यांचेशी संपर्क करावा.**

---

**मार्गदर्शन अधिकारी– मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र ठाणे.**
**मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि ठाणे परिक्षेत्र ठाणे**


संपर्क पत्ता :–ला.प्र.वि. सिंधुदुर्ग, कुडाळ तहसीलदार कार्यालयासमोर, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, (४१६५२०)
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dyspacbsindhudurga@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– acbmaharashtra.net
टोल फ्री नंबर :– १०६४
दुरध्वनी क्र. :– ०२३६२–२२२२८९


पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग

पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो
सिंधुदुर्ग.